सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४४२,
ई-मेल-desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट:http://www.dtemaharashtra.gov.in

क्र. २/एनजीसी/मान्यता-विकाऔं/अेआयसीटीई/२३-२४/८९६ दिनांक: 9 OCT 2023

कार्यालयीन आदेश :

विषय : अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली व शासन मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून कायम विना-अनुदान तत्त्वावर नवीन संस्था सुरू करणे, विद्यमान संस्थेत नवीन अभ्यासक्रम व सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढीसाठी मान्यतेबाबत......

संदर्भ : १) शासन निर्णय क. मान्यता- २०२३/प्र.क्र.६३/तांशि ४, दि.३०.०६.२०२३
२) शासन निर्णय क्र. मान्यता -२०२३/प्र.क्र. ६३/तांशि-४, दि. ०७.०७.२०२३
२) शासन निर्णय क्र. मान्यता -२०२३/प्र.क्र. ६३/तांशि-४, दि. १९.०७.२०२३

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली या शिखर परिषदेच्या मान्यतेस अनुसरून शासनाने संदर्भीन शासन निर्णयान्वये सोबतच्या **"विवरणपत्र अ"** मध्ये नवीन संस्था व **"विवरणपत्र ब"** मध्ये विद्यमान संस्थेत नवीन अभ्यासक्रम व सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून कायम विनाअनुदानित तत्वावर विहित अटींच्या अधिन राहून सुरू करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार **तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद** यांचे कार्यक्षेत्रात येणा-या सोबतच्या विवरणपत्र "अ" व "ब" मधील संस्थांनी संदर्भीन शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पुर्ततेबाबतची कागदपत्रे या संचालनालयास उपलब्ध करुन दिली आहेत. संबंधित संस्थांनी शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्ती यांचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२ फेब्रुवारी २०१८ अन्वये निर्धारीत संयुक्त खात्यात १० वर्ष मुदतीची मुदतठेव व निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क इ. बाबतची कागदपत्रे सादर केली आहेत. तसेच संबंधित विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता संलग्नता / तात्पुरती संलग्नता प्रदान केलेली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन संदर्भीन शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्ती सह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सोबतच्या **"विवरणपत्र अ"** मध्ये दर्शविलेल्या नवीन संस्थेतील अभ्यासक्रमांना व **"विवरणपत्र ब"** मध्ये दर्शविलेल्या विद्यमान संस्थेतील नवीन अभ्यासक्रमास व सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमता वाढीसह या अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांना विहित पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली तसेच शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

२. शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर अनिवार्य बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी संस्थेच्या संकेतस्थळावर अद्ययावत करतील. तसेच संचालनालयाने निर्देशित केलेली माहिती संस्थांना संचालनालयामार्फत विकसीत केलेल्या प्रवेश क्षमता मान्यतेच्या पोर्टलवर अद्ययावत करणे अनिवार्य राहील.

३. संस्थेने प्रवेशासाठी संबंधित पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश नियामक प्राधिकरण यांचेकडे, तसेच संबंधित पदविका अभ्यासक्रमांची तंत्र शिक्षण संचालनालय यांचेकडे नोंदणी व तद्अनुषंगिक कार्यवाही करणे आवश्यक राहील.

४. शासनाने, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली व या संचालनालयाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासन / फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया नवी दिल्ली, यांना राहतील.

५. शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२ फेब्रुवारी २०१८ अन्वये ज्या बाबींसाठी दुस-या वर्षासाठी संयुक्त खात्यात मुदतठेव विहित केलेली आहे, अशा बाबींसाठी संबंधित संस्थांनी दुसरे शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापुर्वी संस्थेचे अध्यक्ष / सचिव व संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संयुक्त नांवे १० वर्षासाठीची मुदतठेवीची पावती पडताळणीसाठी संबंधित तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालयाकडे सादर करणे अनिवार्य राहील.

६. ज्या सस्थांच्या अभ्यासक्रमांना संबंधित विद्यापीठाने संलग्नता अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रदान केली असल्यास संलग्नतेच्या आदेशातील अटी व शर्तीची पुर्तता संबंधित संस्थांना करणे बंधनकारक राहील. तसेच संबंधित संस्थांना विद्यापीठ / मंडळाच्या नियमांप्रमाणे नियमित संलग्नता घेणे बंधनकारक राहील.

७. सक्षम प्राधकि-याच्या मान्यतेचे आग प्रतिबंधक प्रमाणपत्र असणे व या प्रमाणपत्राचे वेळोवेळी नुतनीकरण करणे अनिवार्य राहील.

८. विद्यार्थी, विद्यार्थीनी, महिला, मागासवर्गीय व सर्वसाधारण अधिकारी / कर्मचारी यांच्या तक्रारींचे निवारण करण्याकरीता शिखर परिषद / शासन / विद्यापीठ यांचे निर्देशानुसार स्वतंत्र समित्या गठित करणे अनिवार्य राहील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती व या व्यतिरीक्त वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे विवरणपत्र “अ” व “ब” मधील संस्थांना बंधनकारक राहील.

(डॉ.विनोद मोहितकर)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत- मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र शासन, ९ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायर मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१
२. कुलसचिव, स्वामी रामनंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड / डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
४. संबंधित संस्था
५. कार्यासन क्र. २ अ व ३ मुख्य कार्यालय, मुंबई.
६. निवड नस्तीस.

Annexure A

Directorate of Technical Education, M.S. Mumbai - Office Order No. 2/NGC/MANYATA-RONA/PCI/23-24/896, Dated 9 /10/2023

List of New Institute [Approved by AICTE Government of Maharashtra A.Y. 2023-24]

| Sr, No. | Permanent Id | DTE Code | Institute Name & Address | District | Government Resolution No. and Date | Program | University | Level | Name of Course | Intake Approved for 2022-23 | Intake Approved for 2023-24 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1-43366092703 | 2633 | YASHODEEP INSTITUTE OF COMPUTER APPLICATION MCA, GUT NO.114 BEED ROAD AURANGABAD. | AURANGABAD | G.R.No.Manyata-2023/C.R.63/TE-4, Dated-7th July, 2023 | MCA | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | POST GRADUATE | MCA | 0 | 120 |
| 2 | 1-43370531165 | 2638 | DNYANSADHANA PRATISHTHAN EDUCATIONAL INSTITUTION, AKASHWANI PARISAR DHARMAPURI PATI JINTUR ROAD PARBHANI | PARBHANI | G.R.No.Manyata-2023/C.R.63/TE-4, Dated-7th July, 2023 | MANAGEMENT | Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded | POST GRADUATE | MBA | 0 | 60 |
| 3 | 1-43357059247 | 2641 | DR V K PATIL COLLEGE OF ENGINEERING AND TECHNOLOGY, AURANGABAD ROAD, GAD PATI, OSMANABAD | OSMANABAD | G.R.No.Manyata-2023/C.R.63/TE-4, Dated-19th July, 2023 | ENGINEERING AND TECHNOLOGY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | ARTIFICIAL INTELLIGENCE (AI) | 0 | 30 |
| | | | | | | | | | CIVIL ENGINEERING | 0 | 60 |
| | | | | | | | | | COMPUTER SCIENCE AND ENGINEERING | 0 | 60 |
| | | | | | | | | | ELECTRICAL ENGINEERING | 0 | 60 |
| | | | | | | | | | MECHANICAL ENGINEERING | 0 | 30 |

(Dr. Vinod Mohitkar)
Director,
Technical Education, M.S., Mumbai

Annexure B

Directorate of Technical Education, M.S. Mumbai - Office Order No. 2/NGC/MANYATA-RONA/PCI/23-24/896, Dated 9 /10/2023

List of Increase in intake / New courses , New Programe, Division Full and Intake Restoration in existing institute, Approved by AICTE and Government of Maharashtra for A.Y. 2023-24

| SR. No. | Permanent Id | DTE CODE | Institute Name & Address | District | Government Resolution No. and Date | Program | University | Level | Name of Course | Intake Approved for 2022-23 | Intake Approved for 2023-24 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1-7854956 | 2112 | SHREEYASH PRATISHTHAN'S, SHREEYASH COLLEGE OF ENGINEERING & TECHNOLOGY, GUT NO. 258, SATARA TANDA, AURANGABAD-431005 DIST: AURANGABAD MAHARASHTRA | AURANGABAD | Government Resolution No.Manyata-2023/C.R.63/TE-4, Dated- 30th June, 2023 | ENGINEERING AND TECHNOLOGY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | POST GRADUATE | 5G | 0 | 18 |
| | | | | | | | | POST GRADUATE | VLSI | 0 | 18 |
| | | | | | | | | POST GRADUATE | LOGISTICS | 0 | 18 |
| | | | | | | | | UNDER GRADUATE | COMPUTER SCIENCE AND ENGINEERING (ARTIFICIAL INTELLIGENCE AND MACHINE LEARNING) | 0 | 30 |
| | | | | | | | | UNDER GRADUATE | VLSI | 0 | 30 |
| | | | | | | | | UNDER GRADUATE | 5G | 0 | 30 |
| | | | | | | | | UNDER GRADUATE | LOGISTICS | 0 | 30 |

OFFICE OF THE DIRECTORATE OF TECH. EDN. M.S. MUMBAI

(Dr. Vinod Mohitkar)
Director,
Technical Education, M.S., Mumbai